# प्रकरण पाचवे

# प्रकरण पाचवे

# आधारसामुग्रीचे संकलन, वर्गीकरण, सारणीकरण आणि अर्थनिर्वचन

## ५.१ प्रास्ताविक -

संकलित माहितीचे वर्गीकरण केल्यामुळे तिचा अर्थ लावण्यात येतो. संशोधन करीत असताना संशोधनाचे निष्कर्ष काढण्यासाठी अनेक प्रकारची माहिती मोठ्या प्रमाणावर संकलित केली जाते. या माहित पैकी सर्वच माहिती संशोधकाला उपयोगी ठरेलच असे नाही. परंतू यातील जी माहिती आवश्यक आहे , ती सुध्दा मोठ्या प्रमाणात व विविध प्रकारांची असू शकते ती माहिती जशीच्या तशी अहवालात मांडता येत नाही व वर्गीकरण केल्याशिवाय विश्लेषण, कोष्टकीकरण व अर्थनिर्वचन या दोन्ही क्रिया संशोधकाला अवघड होवून जातात. म्हणून माहितीचे वर्गीकरण महत्त्वाचे आहे. माहितीच्या वर्गीकरणामुळे काही फायदे होतोत ते पुढील प्रमाणे-

अ. माहितीचे वर्गीकरण केल्यामुळे तिचा अर्थ लावाता येतो.

ब. सर्व माहिती वस्तुनिष्ठ पद्धतीने नोंदविता येते.

क. समस्येचे निराकरण करण्याकरीता पुरावा म्हणून आधार सामुग्रीचे संग्रहण व वर्गीकरण हा संशोधनातील महत्त्वाचा टप्पा आहे.

# ५.२ प्रश्नावलीवरुन माहितीचे वर्गीकरण व अर्थनिर्वचन

## *शिक्षक प्रश्नावली*

**कोष्टक ५.१**

**१) वर्गाची एकूण विद्यार्थी संख्या .**

| अ.क्र. | शाळेचे नाव | इयत्ता | मुलींची संख्या | मुलांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्यु.इंग्लिश स्कूल,चिंचणेर-वंदन | ९ वी | २५ | ३५ | ६० |
| २ | लोकमंगल हायस्कूल,कोडोली | ९ वी | २५ | ३० | ५५ |
| ३ | न्यु.इंग्लिश स्कूल, निगडी | ९ वी | ३० | ३५ | ६५ |
| ४ | भोरे हायस्कूल, देगांवरोड. | ९ वी | २८ | २२ | ५० |
| ५ | न्यु.इंग्लिश स्कूल, चिंचणेर-निंब | ९ वी | २७ | ३० | ५७ |

**अर्थनिर्वचन -**

१) न्यु.इंग्लिश स्कूल,चिंचणेर-वंदन या शाळेमध्ये मुलींची संख्या ४२% आहे तर मुलांची संख्या ५८% आहे.

२) लोकमंगल हायस्कूल,कोडोली या शाळेमध्ये मुलींची संख्या ४५% आहे तर मुलांची संख्या ५५% आहे.

३) न्यु.इंग्लिश स्कूल, निगडी या शाळेमध्ये मुलींची संख्या ४६% आहे तर मुलांची संख्या ५४% आहे.

४) भोरे हायस्कूल, देगांवरोड.या शाळेमध्ये मुलींची संख्या ५६% आहे तर मुलांची संख्या ४४% आहे.

५) न्यु.इंग्लिश स्कूल, चिंचणेर-निंब या शाळेमध्ये मुलींची संख्या ४७% आहे तर मुलांची संख्या ५३% आहे.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की एकूण वर्ग संख्येचा विचार करता मुली व मुलांच्या संख्येत फारशी तफावत आढळत नाही.

**कोष्टक ५. २**

**२) वर्गातील मुलींची उपस्थिती**

| **प्रतिसादक** | **१००%** | **९०%** | **८०%** | **७०%** | **७५%** | **७५% पेक्षा कमी** |
|---|---|---|---|---|---|---|
| **शिक्षक संख्या** | २ | ३ | ० | ० | ० | ० |
| **शेकडा प्रमाण** | ४०% | ६०% | ०० | ०० | ०० | ०० |

**अर्थनिर्वचन -**

१) ४० % शिक्षकांच्या मते वर्गातील मुलींचा उपस्थिती १००% असते.

२) ६०% शिक्षकांच्या मते वर्गातील मुलींचा उपस्थिती ९०% असते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त मुली शाळेत उपस्थित राहातात.

**कोष्टक ५.३**

**३) मुलींच्या गैरहजेरीचे कारण**

| प्रतिसादक | पालकांचा शिक्षणाला विरोध | घरकामात मदत | लहान भावंडांना सांभाळणे | आर्थिक मदतीसाठी काम करणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | १ | २ | १ | १ | |
| शेकडा प्रमाण | २०.०० | ४०.०० | २०.०० | २०.०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) २० % मुलींच्या गैरहजेरीचे कारण पालकांचा शिक्षणाला विरोध हे आहे .

२) ४० % मुलींच्या गैरहजेरीचे कारण पालकांचा घरकामात मदत हे आहे .

३) २० % मुलींच्या गैरहजेरीचे कारण लहान भावंडाना सांभळणे हे आहे .

४) २० % मुलींच्या गैरहजेरीचे कारण आर्थिक मदतीसाठी काम करणे हे आहे .

निष्कर्ष - यावरुन असे स्पष्ट होते की, घरातील अडचणीमुळे काही मुली शाळेत उपस्थित राहू शकत नाहीत.

**कोष्टक ५.४**

**४. शाळेमध्ये आरोग्य शिक्षण हा विषय शिकविला जातो का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० % शिक्षकांच्या मते शाळेत आरोग्य शिक्षण हा विषय शिकविला जातो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की शाळेमध्ये आरोग्य शिक्षण हा विषय शिकविला जातो.

**कोष्टक ५.५**

**५. आरोग्य शिक्षण या विषयाला स्वतंत्र अभ्यासक्रम आहे का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | शारीरिक शिक्षणाच्या अंतर्गत | एकूण |
|---|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ० | ० | ५ | ५ |
| शेकडा प्रमाण | ०० | ०० | १००.०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० टक्के शिक्षकांच्या मते शालेय स्तरावर आरोग्य शिक्षण या विषयाला स्वतंत्र अभ्यासक्रम नसून तो शारीरिक शिक्षणांर्तगत येतो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की शारीरिक शिक्षणांर्तगतच आरोग्य शिक्षण हा विषय शिकविला जातो.

**कोष्टक ५.६**

**६.आरोग्य शिक्षण देण्यासाठी मुली व मुलांसाठी स्वतंत्र स्त्री व पुरुष शिक्षक आहेत का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% टक्के शिक्षकांच्या मते आरोग्य शिक्षण हा विषय शिकविण्यासाठी मुलींना स्त्री शिक्षिका व मुलांना पुरुष शिक्षक आहेत.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, आरोग्य शिक्षण हा विषय शिकविण्यासाठी मुलींना स्त्री शिक्षिका व मुलांना पुरुष शिक्षक आहेत.

**कोष्टक ५.७**

**७ . पौगंडावस्थेतील काळ हा वादळी अशांततेचा काळ मानला जातो यावर तुमचे मत काय?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्था काळ हा वादळी अशांततेचा काळ मानला जातो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की पौगंडावस्था काळ हा वादळी अशांततेचा काळ मानला जातो .

**कोष्टक ५.८**

**८.पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणाऱ्या बदलामुळे त्याच्यात अस्थिरता निर्माण होते का?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणाऱ्या बदलामुळे त्याच्यात अस्थिरता निर्माण होते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणाऱ्या बदलामुळे त्याच्यात अस्थिरता निर्माण होते .

**कोष्टक ५.९**

**९ . पौगंडावस्थेतील मुलींना शारीरिक बदलांना सामोरे जाण्यासाठी शारीरिक आरोग्यविषयक माहिती शाळेमधून दिली जाते का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील मुलींना शरीरिक बदलांना सामोरे जाण्यासाठी शारीरिक आरोग्यविषयक माहिती शाळेमधून दिली जाते .

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील मुलींना शरीरिक बदलांना सामोरे जाण्यासाठी शारीरिक आरोग्यविषयक माहिती शाळेमधून दिली जाते .

**कोष्टक ५.१०**

**१० . पौगंडावस्थेतील मुलींना शाळेमध्ये वैयक्तीक तसेच सार्वजनिक स्वच्छतेचे व चांगल्या सवयीचे महत्त्व सांगण्यात येते का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील मुलींना शाळेमध्ये वैयक्तीक तसेच सार्वजनिक स्वच्छतेचे व चांगल्या सवयीचे महत्त्व सांगण्यात येते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील मुलींना शाळेमध्ये वैयक्तीक तसेच सार्वजनिक स्वच्छतेचे व चांगल्या सवयीचे महत्त्व सांगण्यात येते.

**कोष्टक ५.११**

**११ . १३ ते १८ वयोगटातील मुलींना आपल्यामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव असते ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० %शिक्षकांच्या मते १३ ते १८ वयोगटातील मुलींना आपल्यामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव असते .

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, १३ ते १८ वयोगटातील मुलींना आपल्यामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव असते .

**कोष्टक ५.१२**

**१२ .ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुली व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्यविषयक जाणीवात काही तफावत आढळून येते का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१ )१००% टक्के शिक्षकांच्या मते ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुली व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्यविषयक जाणीवात तफावत आढळून येते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुली व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्यविषयक जाणीवात तफावत आढळून येते.

**कोष्टक ५.१३**

**१३ . पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी ग्रामीण भागात पालक वर्ग जागृक आहे का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | १ | ४ | ५ |
| शेकडा प्रमाण | २०.०० | ८०. ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) २० % शिक्षकांच्या मते, पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी ग्रामीण भागात पालक वर्ग जागृत आहेत.

२) ८०% शिक्षकांच्या मते, पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी ग्रामीण भागात पालक वर्ग जागृत नाही .

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त प्रमाणात ग्रामीण भागातील पालक हे पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी जागृत नाहीत.

**कोष्टक ५. १४**

**१४ .शाळेमधून पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आरोग्यविषयक माहिती एकत्रित दिली जाते की स्वतंत्र दिली जाते ?**

| प्रतिसादक | एकत्रित | स्वतंत्र | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ० | ५ | ५ |
| शेकडा प्रमाण | ०० | १००.०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० % टक्के शिक्षकांच्या मते, शाळेमधून पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आरोग्यविषयक माहिती स्वतंत्रपणे दिली जाते .

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, शाळेमधून पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आरोग्यविषयक माहिती एकत्र न देता स्वतंत्र दिली जाते .

**कोष्टक क्र.५.१५**

**१५) शालेय स्तरावर लैंगिक शिक्षणाची माहिती देणे योग्य की अयोग्य आहे.**

| प्रतिसादक | योग्य | अयोग्य | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० %टक्के शिक्षकांच्या मते शालेय स्तरावर लैंगिक शिक्षणाची माहिती देणे योग्य आहे.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते सद्य:स्थितीत शाळेतून लैंगिक शिक्षण देणे गरजेचे आहे.

**कोष्टक ५.१६**

**१६) पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनासाठी शाळा विविध उपक्रम राबविते का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १००% टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनासाठी शाळा विविध उपक्रम राबविते.

**निष्कर्ष - यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनासाठी शाळांमधून विविध उपक्रम राबविले जातात.**

**कोष्टक ५.१७**

**१७) शाळा राबवित असलेल्या पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धन विषयक उपक्रमामध्ये पालकांचा सहभाग असतो की त्या उपक्रमाबद्दल पालकांमध्ये उदासीनता असते.**

| प्रतिसादक | सहभाग | उदासिनता | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | १ | ४ | ५ |
| शेकडा प्रमाण | २०.०० | ८०.०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) २० टक्के शिक्षकांच्या मते शाळा राबवित असलेल्या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन

विषयक उपक्रमामध्ये पालकांचा सहभाग असतो.

२) ८० टक्के शिक्षकांच्या मते शाळा राबवित असलेल्या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन विषयक उपक्रमा बद्दल पालकांमध्ये उदासीनता असते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की शाळा राबवित असणा-या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन विषयक उपक्रमाबद्दल जास्तीत जास्त पालक उदासीन आहेत.

**कोष्टक ५.१८**

**१८) शाळा राबवित असलेल्या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन विषयक उपक्रमाबद्दल पालकांमध्ये उदासिनता असण्याचे कारण काय ?**

| प्रतिसादक | पालकांची साक्षरता | लैंगिक शिक्षणाला विरोध | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ० | ५ | ५ |
| शेकडा प्रमाण | ०० | १००.०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या कार्यक्रमांतर्गत शालेय स्तरावरील मुला-मुलींना जे लैंगिक शिक्षण दिले जाते त्यामुळे पालकांच्यामध्ये शाळा राबवित असलेल्या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन विषयक उपक्रमाविषयी उदासिनता आहे.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, शालेय स्तरावर दिल्या जाणा-या लैंगिक शिक्षणाला पालकांचा विरोध आहे.

**कोष्टक ५.१९**

**१९) पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेला जीवन कौशल्य विषयक उपक्रम आपल्या शाळेत राबविला जातो का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेला जीवन कौशल्य विषयक उपक्रम शाळामधून राबविला जातो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेला जीवन कौशल्य विषयक उपक्रम शाळांमधून राबविला जात आहे.

**कोष्टक ५.२०**

**२०) पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेला जीवन कौशल्य विषयक उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -** १०० टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धनासाठी युनिसेफ राबवित

असलेला जीवनकौशल्य विषयक उपक्रम राबविणा-या शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की जीवनकौशल्य विषयक उपक्रम राबविणारे शिक्षक हे प्रशिक्षितच असतात.

**कोष्टक ५.२१**

**२१) पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेले जीवन कौशल्य विषयक उपक्रम हे मुलांच्या सर्वांगीण विकासाठी उपयुक्त ठरतात का ?**

| प्रतिसादक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| शिक्षक संख्या | ५ | ० | ५ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | ०० | १००.०० |

**अर्थनिर्वचन -**

१) १०० टक्के शिक्षकांच्या मते पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेले जीवनकौशल्य विषयक उपक्रम हे मुलांच्या सर्वांगीण विकासाठी उपयुक्त ठरतात.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की युनिसेफ पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धनासाठी राबवित असलेले जीवनकौशल्य उपक्रम हे मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यास उपयुक्त ठरतात.

## ५.3 मुलाखतीसाठीच्या प्रश्नावरुन माहितीचे अर्थनिर्वचन -

**१) ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते ?**

१) त्यांच्यात होणाऱ्या बदलांबद्दल योग्य माहिती त्यांना मिळत नाही, कारण ही माहिती देण्यास पालक उदासिन असतात.

२) अनेक बंधने लादली जातात.

२) या वयात मुलींकडून काही चुका घडू नयेत, म्हणून पालक मुलींची शाळा बंद करतात.

४) मुलगी वयात आली म्हणून तिच्या लग्नाचा लवकरच विचार केला जातो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की ग्रामीण भागात आजही मुलींकडे बघण्याचा दृष्टीकोन फारसा बदल नसल्याने आजही मुलींना समस्यांना सामोरे जावे लागते.

**२) पौगंडावस्थेतील काळ हा वादळी अशांततेचा काळ मानला जातो यावर तुमचे मत काय ?**

- कारण या वयात पौगंडावस्थेतील मुलींमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक बदल होत असतात पण हे बदल कशामुळे होतात हे त्यांना माहित नसते. पालकांच्या वर्तनातील बदल व परस्पर विरोधी विधानांमुळे हया मुली गोंधळून जातात. आपल्या बाबतीत नक्की काय घडत आहे हे न कळाल्यामुळे हया मुलींच्या आयुष्यात वादळ निर्माण होत असल्याने या काळास वादळी अशांततेचा काळ मानतात.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की पौगंडावस्थेतील काळ हा या वयातील मुलींच्या आयुष्यातील अस्थिरतेचा काळ असतो.

**३) समाजामध्ये वावरत असताना १३ ते १८ या वयोगटातील मुलींचे वर्तन कसे असते ?**

१) या मुलींमध्ये होणारे बदल हे कशामुळे होतात हे न कळाल्याने या मुली लाजऱ्या बुजऱ्या होतात.

२) कोणाशी कसे वागावे हेच त्यांना कळत नाही.

३) घरातून व समाजामधून त्यांच्यावर घातल्या जाणा-या बंधनाविषयी त्यांच्या मनात तिटकारा असतो.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, या वयोगटातील मुलींचे समाजाच्या दबावाला अनुसरुन समाजाला अनुरुप असे वर्तन असते किंवा सर्व बंधने झुगारुन स्वतंत्रपणे वर्तन करण्याचा प्रयत्न करतात.

**४)१३ ते १८ या वयोगटातील मुलींचे वर्गातील समवयस्कांन बरोबरचे वर्तन कसे असते ?**

१) त्या मैत्रिणीशी एकनिष्ठ असतात.

२) घरातील व्यक्तीपेक्षा मैत्रिण जास्त जवळची वाटते.

३) या वयोगटातील मुली या विषमलिंगी व्यक्तीकडे आकर्षित होतात.

४) या वयोगटातील मुलींना गटाने राहायला जास्त आवडते.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की या वयोगटातील मुली समवयस्कांशी एकनिष्ठ असतात.

**५) आपल्यामध्ये होणाऱ्या बदलांचे कितपत ज्ञान या वयोगटातील मुलींना असू शकते ?**

१) खूपच कमी मुलींना आपल्यामध्ये होणाऱ्या बदलांचे ज्ञान असते.

**निष्कर्ष** - यावरुन असे स्पष्ट होते की मुलींमध्ये स्वतःमध्ये होणाऱ्या बदलांबद्दलच्या ज्ञानात कमतरता असते.

**६) ग्रामीण भागतील पौगंडावस्थेतील मुली व शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्यविषयक जाणीवात काही तफावत आढळते का ? कोणती ?**

१) ग्रामीण भाग व शहरी भागातील मुलींच्या आरोग्य जाणीवात फरक आढळतो. या मागचे महत्त्वाचे कारण म्हणजे शहरी भागातील पालकांची जागृकता होय.

२) शहरी भागातील आई ही या वयातील मुलींना काही प्रमाणात तरी ज्ञान देण्याचा प्रयत्न करते. शहरी भागातील आई - मुलीतील नाते हे मैत्रिणीचे असते.

३) या उलट ग्रामीण भागातील स्त्रीया या आपल्या मुलींना आरोग्यविषयक ज्ञान देण्यास असमर्थ ठरतात. त्या स्वतः दबावामध्ये राहात असल्याने त्या मुलींना ही या ज्ञानापासून वंचित ठेवतात.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींपेक्षा शहरी भागातील पौगंडावस्थेतील मुलींमध्ये आरोग्यविषयक जाणीवा जास्त आढळतात.

**७) पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धनासाठी युनिसेफ राबवित असलेल्या जीवन कौशल्य उपक्रम या कार्यक्रमाचे उद्दिष्ट काय ?**

१) पौगंडावस्था हा काळ वादळी अशांततेचा असल्याने मुलींच्या आयुष्याला योग्य वळण देणे.

२) एड्स सारख्या महाभयंकर रोगाच्या विळख्यातून युवापिढीला वाचविणे.

३) या वयातील मुलींच्यामध्ये जीवनावश्यक कौशल्य रुजवून त्यांचे जीवन अर्थपूर्ण बनविणे.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धन हा कार्यक्रम युनिसेफ मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित आहे.

**८) पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आरोग्य शिक्षण/लैंगिक शिक्षण एकत्रीत दिले जावे की स्वतंत्र दिले जावे आणि का?**

१) पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आरोग्य शिक्षण/लैंगिक शिक्षण वेगवेगळे देण्यात यावे.

२) मुला-मुलींना जर हे शिक्षण एकत्र दिले तर त्यांचे दुष्परिणाम होतील.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की मुला-मुलींना आरोग्य विषयक शिक्षण एकत्र देवू नये.

**९) पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धन या कार्यक्रमांबाबत पालकांची प्रतिक्रिया काय आहे ?**

१) पौगंडावस्थेतील आरोग्यसवंर्धन या कार्यक्रमाबाबत पालक उदासीन आहेत.

२) या कार्यक्रमामध्ये मुला-मुलींना दिल्या जाणा-या लैंगिक शिक्षणाच्या विरोधात पालक आहेत.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की पालक पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धन या कार्यक्रमामध्ये पालक केवळ लैंगिक शिक्षण हया दृष्टीने पाहात असल्याने त्या कार्यक्रमाविषयी पालकांमध्ये उदासिनता आहे.

**१०) शाळेमध्ये आरोग्य शिक्षण देण्यासाठी कोणकोणत्या माध्यमांचा वापर केला जातो ?**

१) व्याख्याने २) टी. व्ही. ३) रेडिओ ४) चित्रपट ५) आरोग्य पत्रिका ६) आरोग्य पुस्तके ७) सी.डी. ८) तक्ते ९) प्रदर्शने १०) क्षेत्र भेटीं ११) पोस्टर्स १२) इंटरनेट (ई आरोग्य ) १३) आरोग्य तपासणी १४) योगासन वर्ग १५) व्यायाम शाळा.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की शाळेमध्ये आरोग्य शिक्षण देण्यासाठी अनेक माध्यमांचा वापर केला जातो.

**११) पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या कार्यक्रमातून मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी कोण- कोणत्या जीवन कौशल्यांचे शिक्षण शाळेत दिले जाते ?**

१) स्वत्वाची जाणीव

२) परिणामकारक सुसंवाद

३) निर्णय क्षमता

४) समस्या निराकरण

५) सृजनशीलता — ६) चिकित्सक विचार

७) व्यक्ती-व्यक्तीतील सहसंबंध — ८) समानानुभूती

९) भावनांचे समायोजन — १०) ताणतणावांचे समायोजन

**निष्कर्ष** - यावरुन असे स्पष्ट होते की पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या कार्यक्रमात एकूण १० कौशल्यांचे शिक्षण दिले जाते

**१२) पौगंडावस्थेतील मुलींमध्ये जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी कोणते उपक्रम राबविण्यात येतात ?**

१) पालक सभा — २) माहिती सत्रे

३) सहशालेय उपक्रम — ४) चित्रकला स्पर्धा

५) भित्ती पत्रक — ६) प्रश्नपेटी

७) मूल्यांचे स्पष्टीकरण — ८) निबंध स्पर्धा

९) रांगोळी स्पर्धा — १०) स्लाईड शो

११) व्हिडिओ — १२) चित्र प्रदर्शन

१३) क्षेत्रभेटी — १४) प्रश्नपेटी

१५) सहशालेय उपक्रम — १६) दिन साजरे करणे

१) गट चर्चा २) भूमिका नाटय ३) प्रश्न मंजूषा

**निष्कर्ष** - यावरुन असे स्पष्ट होते की पौगंडावस्थेतील मुलींमध्ये जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

**१४) पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या आरोग्यसंवर्धनासाठी शासन कोणकोणते उपक्रम राबविते ?**

१) मीना मंच सारखे मंच स्थापन करुन पौगंडावस्थेतील मुलींना आरोग्यविषयक ज्ञान देणे.

२) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत पौगंडावस्थेतील मुलींसाठी कार्यक्रमांचे आयोजन.

३) तज्ञांची व्याख्याने.

३) आरोग्य तपासणी.

**निष्कर्ष -** यावरुन असे स्पष्ट होते की, पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या आरोग्यसंवर्धनासाठी शासन बरेच उपक्रम राबविते.

## ५.४ प्रयोगावरुन केलेले माहितीचे वर्गीकरण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष -

१) संशोधिकेने दोन गट समतुल्य करण्यासाठी पूर्वचाचणी दिल्यानंतर स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यावर आधारित असणारी प्रावीण्य पूर्व चाचणी दोन्ही गटातील विदयार्थिनींना दिली. त्यांनतर स्वत्वाची जाणीव विषयक उपक्रमांची मात्रा प्रायोगिक गटाला दिली . नियंत्रित गटाला या उपक्रमांच्या मात्रांचा अभाव होता. त्यानंतर दोन्ही गटांना स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यावर आधारित उत्तर चाचणी दिली. त्यातील प्रायोगिक गटाने स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यावर आधारित असणा-या प्राविण्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित केलेल्या गुणांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**परिकल्पना - $H_1$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

**शून्य परिकल्पना -**

स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. १ मध्ये प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२२**

**प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यातील संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरड़िं |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ४६.२८ | ७.२१ | २८ | ४.५६ | २.०५ | २.७७ | २७ | * * |
| उत्तर चाचणी | ५५.१४ | ७.३१ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान **४६.२८** एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान **५५.१४** एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक **८.८६** एवढा आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान हे जास्त आहे.

२) प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन **७.२१** एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन **७.३१** एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक **०.०९७** एवढा आहे. उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलन हे पूर्व चाचणी गुणांक प्रमाण विचलनापेक्षा जास्त आहे. यावरुन पूर्व चाचणीत हा गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७ असून प्राप्त टी मूल्य **४.५६** हे त्यापेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य **४.५६** हे नमुना टी-मूल्य २.७७ त्यापेक्षा अधिक आहे म्हणून ०.०१ सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या वयात येताना या आरोग्य विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना त्यांच्यात होणा-या शारीरिक, मानसिक,भावनिक बदलाची जाणीव झाल्याने त्याच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

१. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या प्रयोगामुळे प्रायोगिक गटातील मुली स्वत:बद्दल व स्वत:च्या प्रश्नाबद्दल शिक्षकांशी, आई - वडीलांशी मुक्त विचार करु लागल्या, आपल्या समस्या मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्या, त्यामुळे त्यांच्या पूर्व चाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

२. प्रायोगिक गटातील मुली प्रयोगामुळे विशिष्ट प्रकारचे भय दूर करण्यासाठी सखोल विचार करु लागल्याने त्यांच्यात असणाऱ्या भयगंड,लाजाळूपणा व बुजरेपणा, कसे सांगू, कुणाला सांगू या वृत्तीत बदल झाल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली म्हणून ही वाढ प्रयोगाच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

३. प्रायोगिक गटातील मुलींना स्वत:चे मुल्यमापन करायला प्रवृत्त करणारी एक प्रश्नावली दिल्याने या मुलींना स्वत:च्या बाबतीत विचार करण्याची व योग्य- अयोग्याची चिकित्सा करुन निवड करण्याची संधी मिळाल्याने त्याच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

४. प्रयोगामध्ये दिलेल्या प्रश्नावलीच्या अनुरोधाने स्वत:ला पडताळून पाहत स्वत:तील भावना, आवडी - निवडी यांच्यात योग्यरीतीने बदल घडवून आणण्यास सतत प्रयत्नशील राहिल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्वचाचणी संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

५. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या Swot Analysis या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना परस्पर संवादातून, चर्चेतून गुण - दोष म्हणजे काय, गुणांचे दोषात व दोषांचे गुणात रुपांतर कसे होते, तसेच गुण दोषातून निर्माण होणाऱ्या संधी व धोके यांची जाणीव झाल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्वचाचणी संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

६. प्रायोगिक गटाला दिलेल्या मात्रेमुळे प्रायोगिक गटातील मुली या स्वत:तील गुण - दोष पडताळू लागल्या, गुण - दोषांची वर्गवारी करु लागल्या, गुणांची वृद्धी व दोषांची निवृत्ती करण्यासाठी विचार करु लागल्याने, सतत प्रयत्नशील राहिल्याने त्यांच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

**परिकल्पना - $H_2$ चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

**शून्य परिकल्पना -**

स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. १ मध्ये नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२३**

**नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्यातील संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातीलविद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ४५.३२ | ५.५२ | २८ | ०.५८ | २.०५ | २.७७ | २७ | n.c |
| उत्तर चाचणी | ४६.२८ | ६.७१ | | | | | | |

वरील कोष्टकात नियंत्रित गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) नियंत्रित गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ४५.३२ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ४६.२८ एवढे आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ०.९६ एवढा आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान किंचित जास्त आहे.

२) नियंत्रित गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ५.५२ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ६.७१ एवढे आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक १.१८ एवढा आहे. पूर्व चाचणीत नियंत्रित गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ०.५८ आहे.

**निष्कर्ष**

१) प्राप्त टी मूल्य (०.५८) हे नमुना टी मूल्यापेक्षा (२.७७) कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही. म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली .

२) नियंत्रित गटाच्या स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळते.

**परिकल्पना H3 चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

**शून्य परिकल्पना -**

स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. १ मध्ये प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२४**

**प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींनी स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्यातील उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| प्रायोगिक गट | ५५.१४ | ७.३१ | ५६ | ४.५६ | २.०१ | २.६८ | ५४ | ** |
| नियंत्रित गट | ४६.२८ | ७.२१ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक व नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ५५.१४ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ४६.२८ आहे. यावरुन असे दिसते की, प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान हे नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणी मध्यमानापेक्षा खूपच जास्त आहे. दोन्ही गटातील मध्यमानातील फरक ८.८५ एवढा आहे.

२) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ७.३१ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ७.२१ एवढे आहे. प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलनातील फरक ०.०९७ एवढा आहे. नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन प्रायोगिक गटाच्या प्रमाण विचलनापेक्षा कमी आहे. यावरुन असे समजते की नियंत्रित गट प्रायोगिक गटाच्या तुलनेत एकजिनसी आहे.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा (df) - ५४ आहे. ५४ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.६८ आहे. प्राप्त टी मूल्य ४.५६ आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.५६ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक आहे म्हणून ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला .

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या वयात येताना या आरोग्य विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना त्यांच्यात होणा-या शारीरिक, मानसिक,भावनिक बदलाची जाणीव झाल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या प्रयोगामुळे त्या मुली स्वतःबद्दल शिक्षकांशी आई - वडीलांशी मुक्त विचार करु लागल्या. आपल्या समस्या मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्या. त्यामुळे त्यांच्या संपादनात वाढ झाली.

४. प्रायोगिक गटातील मुली प्रयोगामुळे विशिष्ट प्रकारचे भय दूर करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्याने त्यांच्यात असणाऱ्या भयगंड, लाजाळूपणा व बुजरेपणा, कसे सांगू, कुणाला सांगू या वृत्तीत बदल झाल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

५. प्रायोगिक गटातील मुलींना स्वतःचे मुल्यमापन करायला प्रवृत्त करणारी एक प्रश्नावली दिल्याने या मुलींना स्वतःच्या बाबतीत विचार करण्याची, योग्य अयोग्याची चिकित्सा करुन निवड करण्याची सधी मिळाल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलोंच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

६. प्रयोगामध्ये दिलेल्या प्रश्नावलीच्या अनुरोधाने स्वतःला पडताळून पाहत स्वतःतील भावना, आवडी - निवडी यांच्यात योग्यरीतीने बदल घडवून आणण्यास सतत प्रयत्नशील राहिल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली.

७. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या Swot Analysis या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना परस्पर संवादातून, चर्चेतून गुण - दोष म्हणजे काय, गुणांचे दोषात व दोषांचे गुणात रुपांतर कसे होते. तसेच गुण दोषातून निर्माण होणाऱ्या संधी व धोके यांची जाणीव झाल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

८. प्रायोगिक गटाला दिलेल्या मात्रेमुळे प्रायोगिक गटातील मुली या स्वतःतील गुण - दोष पडताळू लागल्या, गुण - दोषांची वर्गवारी करु लागल्या व गुणांची वृद्धी व दोषांची निवृत्ती

करण्यासाठी विचार करु लागल्याने सतत प्रयत्नशील राहिल्याने त्यांच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली. त्या तुलनेत नियंत्रित गटात उदासिनता दिसली.

९. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली यावरुन असे स्पष्ट होते, की आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या स्वत्वाची जाणीव या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

२) संशोधिकेने प्रथम स्वत्वाची जाणीव ह्या कौशल्याची पूर्वचाचणी दोन्ही गटांना दिल्या नंतर परिणामकारक सुसंवाद या कौशल्यावर आधारित असणारी चाचणी क्र. २ ची पूर्वचाचणी प्रायोगिक व नियंत्रित दोन्ही गटांना दिल्यानंतर परिणामकारक सुसंवाद या कौशल्यावर आधारित उपक्रमांची मात्रा फक्त प्रायोगिक गटाला दिली . नियंत्रित गटाला या उपक्रमांच्या मात्रांचा अभाव होता. त्यानंतर दोन्ही गटांना परिणामकारक सुसंवाद या जीवन कौशल्यावर आधारित उत्तर चाचणी दिली. त्यातील प्रायोगिक गटाने परिणामकारक सुसंवाद या जीवन कौशल्यावर आधारित असणा-या प्राविण्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित केलेल्या गुणांची तुलना खालीलप्रमाणे दिली आहे.

**परिकल्पना - H4 चे परीक्षण**

**उद्दिष्टे - ( प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.)**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

परिणामकारक सुसंवाद या कौशल्यावर आधारित चाचणी क्र. २ मध्ये प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२५**

**प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या परिणामकारक सुसंवाद जीवन कौशल्यातील संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३१.०७ | ३.६७ | २८ | ४.५७ | २.०५ | २.७७ | २७ | * * |
| उत्तर चाचणी | ३५.९६ | ४.३९ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**<u>निरीक्षण -</u>**

१) प्रायोगिक गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.०७ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३५.९६ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी

गुणांकातील मध्यमानातील फरक ४.८९ एवढा आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान हे जास्त आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.६७ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ४.३९ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.०७२ एवढा आहे. उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलन हे पूर्व चाचणी गुणांक प्रमाण विचलनापेक्षा जास्त आहे. यावरुन पूर्व चाचणीत हा गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ४.५७ हे नमुना टी मूल्यापेक्षा २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे.

**निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.५७ हे नमुना टी मूल्यापेक्षा २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटवर राबविण्यात आलेल्या सांगीतल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना आपले कान (श्रवणशक्ती), डोळे(दृक्शक्ती) व वाचा(वाकशक्ती) हे अतिशय कार्यक्षम असेल तरच मनाचा योग्यरीतीने विकास होईल, याची जाणीव झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या टेलिफोन गेम या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे या गटातील मुलींनी समजून घेवून ऐकण्याचे महत्व जाणल्याने त्यांची ग्रहणशक्ती वाढली. चित्ताची एकाग्रता वाढली, त्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ती पडताळल्या गेल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या ' उपाय शोधा , या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली भावनिक प्रतिसाद व विचारपूर्वक मिळालेला प्रतिसाद यातील फरक जाणण्यास प्रयत्न करतात. त्यासाठी त्या घटनांचे काळजीपुर्वक निरीक्षण करतात व त्यानुसार योग्य प्रतिसाद नोंदवतात, भावनांचा प्रतिसादावर होणारा परिणाम शोधतात व त्यातून योग्य प्रतिसाद नोंदवितात, प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

५.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या सांगितल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली विविध परिस्थितीचे पृथ्थ:करण योग्य प्रकारे कसे करावे, पृथ्थ:करण केलेली माहिती प्रभावीपणे कशी मांडता येईल, आपले विचार अधिक चांगल्या पद्धतीने कसे व्यक्त करता येतील यासाठी विचार करु लागल्याने, प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्व चाचणी संपादनापेक्षा लक्षणीय वाढ झाली.

**परिकल्पना - $H_5$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. २ मध्ये नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२६**

**नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील वि. संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३०.८९ | ३.४६ | | | | | | |
| उत्तर चाचणी | ३१.०३ | ३.८१ | २८ | ०.४७ | २.०५ | २.७७ | २७ | n.c |

वरील कोष्टकात नियंत्रित गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

<u>**निरीक्षण -**</u>

१) नियंत्रित गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३०.८९ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.०३ एवढे आहे.नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी

गुणांकातील मध्यमानातील फरक ०.१३ एवढा आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान किचिंत जास्त आहे.

२) नियंत्रित गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.४६ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.८१ एवढे आहे.नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.३५ एवढा आहे. पूर्व चाचणीत नियंत्रित गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ०.४७ आहे.

निष्कर्ष -

१) प्राप्त टी मूल्य ०.४७ हे नमुना टी मूल्यापेक्षा (२.७७) कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही, म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या परिणामकारक सुसंवाद विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**परिकल्पना - $H_6$ चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे .

**शून्य परिकल्पना -**

परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. २ मध्ये प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.२७**

**प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींनी परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्य उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| प्रायोगिक गट | ३५.९६ | ४.३९ | ५६ | ४.४७ | २.०१ | २.६८ | ५४ | * * |
| नियंत्रित गट | ३१.०३ | ३.८१ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक व नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३५.९६ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३१.०३ आहे. यावरुन असे दिसते की, प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान हे नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणी मध्यमानापेक्षा खूपच जास्त आहे. दोन्ही गटातील मध्यमानातील फरक ४.९२ एवढा आहे.

२) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ४.३९ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ३.८१ एवढे आहे. प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलनातील फरक ०.५८ एवढा आहे. नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन प्रायोगिक गटाच्या प्रमाण विचलनापेक्षा कमी आहे. यावरुन असे समजते की नियंत्रित गट प्रायोगिक गटाच्या तुलनेत एकजिनसी आहे.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा (df) - ५४ आहे. ५४ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.६८ आहे. प्राप्त टी मूल्य ४.४७ आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.४७ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटवर राबविण्यात आलेल्या सांगीतल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना आपले कान (श्रवणशक्ती), डोळे (दृक्‌शक्ती) व वाचा (वाकशक्ती) हे अतिशय कार्यक्षम असेल तरच मनाचा योग्यरीतीने विकास होईल, याची जाणीव झाल्याने प्रायोगिक गटाचे संपादनात नियंत्रित गटातील संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

३.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या टेलिफोन गेम या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे या गटातील मुलींनी समजून घेवून ऐकण्याचे महत्व जाणल्याने त्यांची ग्रहणशक्ती वाढली. चित्ताची एकाग्रता वाढली, त्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ती पडताळल्या गेल्याने त्यांच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या ' उपाय शोधा , या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली भावनिक प्रतिसाद व विचारपूर्वक मिळालेला प्रतिसाद यातील फरक जाणण्यास प्रयत्न करतात. त्यासाठी त्या घटनांचे काळजीपुर्वक निरीक्षण करतात व त्यानुसार योग्य प्रतिसाद नोंदवतात, भावनांचा प्रतिसादावर होणारा परिणाम शोधतात व त्यातून योग्य प्रतिसाद नोंदवितात, त्यामुळे त्यांच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

५.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या सांगितल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली विविध परिस्थितीचे पृथ्थःकरण योग्य प्रकारे कसे करावे, पृथ्थःकरण केलेली माहिती प्रभावीपणे कशी मांडता येईल, आपले विचार अधिक चांगल्या पद्धतीने कसे व्यक्त करता येतील यासाठी विचार करु लागल्याने, प्रयत्नशील राहिल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

६. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली म्हणून आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील

पौगंडावस्थेतील मुलींच्या परिणाम्कारक सुसंवाद या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

३. संशोधिकेने प्रथम स्वत्वाची जाणीव परिणामकारक सुसंवाद या कौशल्यावर आधारित पूर्वेत्तर चाचणी प्रायोगिक व नियंत्रित दोन्ही गटांना दिली त्यानंतर निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित उपक्रमांची मात्रा फक्त प्रायोगिक गटाला दिली. नियंत्रित गटाला या उपक्रमांच्या मात्रांचा अभाव होता. त्यानंतर दोन्ही गटांना निर्णय क्षमता या जीवन कौशल्यावर आधारित असणाऱ्या प्राविण्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित केलेल्या गुणांची तुलना खालीलप्रमाणे दिली आहे.

**परिकल्पना - $H_7$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना**

निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ३मध्ये प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

### कोष्टक क्र. ५.२८

**प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील वि. संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३१.२५ | ३.८९ | २८ | ४.२९ | २.०५ | २.७७ | २७ | * * |
| उत्तर चाचणी | ३६.२१ | ४.७२ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.२५ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३६.२१ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर

चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ४.९६ एवढा आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान हे जास्त आहे.

२) प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.८९ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ४.७२ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.८२ एवढा आहे. उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलन हे पूर्व चाचणी गुणांक प्रमाण विचलनापेक्षा जास्त आहे. यावरुन पूर्व चाचणीत हा गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ४.२९ हे त्यापेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष** -

१. प्राप्त टी मूल्य ४.२९ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेलया निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित प्रसंग वर्णन या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील विद्यार्थिनी एखादा प्रसंग समोर आल्यानंतर त्याच्यावर कशा पद्धतीने विचार करावा, निर्णय घेताना योग्य निर्णय घेण्याची योग्यता निर्माण होण्यासाठी काय करावे, गोंधळलेल्या अवस्थेत सुद्धा योग्य मार्ग शोधून काढण्याची क्षमता कशी निर्माण करावी. यावर सतत विचार करुन त्यासाठी प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय फरक आढळून आला.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली भावनिक निर्णय व विचार पुर्वक घेतलेला निर्णय यातील फरक जाणून घेवून योग्य वेळी योग्य निर्णय कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा विचार करु लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

४. प्रायोगिक गटाला दिलेल्या प्रयोग मात्रेमुळे मुली या एखादा निर्णय घेण्याची वेळ आल्यानंतर तो निर्णय घेताना समस्या नेमकी काय, भोवतालची परिस्थिती, उपलब्ध असलेले पर्याय, त्याचा स्वतःवर व इतरांवर होणारा परिणाम त्याच्या विचार करु लागल्याने त्यांच्यात स्वतः संबंधीचे निर्णय स्वतः घेण्याची प्रवृत्ती वाढल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय फरक आढळून आला.

**परिकल्पना - $H_8$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ३ मध्ये नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

## कोष्टक क्र. ५.२९

| **नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **परीक्षण** | **मध्यमान M** | **प्रमाण विचलन SD** | **गटातील वि. संख्या N** | **प्राप्त टी. मूल्य** | **नमुना टी.मूल्य** | | **स्वाधीनता मात्रा df** | **शेरा** |
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| **पूर्व चाचणी** | ३१.०७ | ३.६७ | २८ | ०.१७ | २.०५ | २.७७ | २७ | n.c |
| **उत्तर चाचणी** | ३१.२५ | ३.८९ | | | | | | |

वरील कोष्टकात नियंत्रित गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -** १) नियंत्रित गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.०७ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.२५ एवढे आहे.नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ०.१८ एवढा आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान किंचित जास्त आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) नियंत्रित गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.६७ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.८९ एवढे आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.२२ एवढा आहे. पूर्व चाचणीत नियंत्रित गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ०.१७ आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ०.१७ हे नमुना टी मूल्यापेक्षा २.७७ कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या निर्णय क्षमताविषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**परिकल्पना - $HO_9$ चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ३ मध्ये प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.३०**

**प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींनी निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्य उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| प्रायोगिक गट | ३६.२१ | ४.७२ | ५६ | ४.२९ | २.०१ | २.६८ | ५४ | * * |
| नियंत्रित गट | ३१.२५ | ३.८९ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक व नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३६.२१ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३१.२५ आहे. यावरुन असे दिसते की, प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान हे नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणी मध्यमानापेक्षा खूपच जास्त आहे. दोन्ही गटातील मध्यमानातील फरक ४.९६ एवढा आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ४.७२ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ३.८९ एवढे आहे. प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलनातील फरक ०.८२ एवढा आहे. नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन प्रायोगिक गटाच्या प्रमाण विचलनापेक्षा कमी आहे. यावरुन असे समजते की नियंत्रित गट प्रायोगिक गटाच्या तुलनेत एकजिनसी आहे.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा (df) - ५४ आहे. ५४ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.६८ आहे. प्राप्त टी मूल्य ४.२९ आहे.

**निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.२९ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे, म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित प्रसंग वर्णन या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील विद्यार्थिनी एखादा प्रसंग समोर आल्यानंतर त्याच्यावर कशा पद्धतीने विचार करावा, निर्णय घेताना योग्य निर्णय घेण्याची योग्यता निर्माण होण्यासाठी काय करावे, गोंधळलेल्या अवस्थेत सुद्धा योग्य मार्ग शोधून काढण्याची क्षमता कशी निर्माण करावी. यावर सतत विचार करुन त्यासाठी प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटाच्या संपानाच्या तुलनेत अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली भावनिक निर्णय व विचार पुर्वक घेतलेला निर्णय यातील फरक जाणून घेवून योग्य वेळी योग्य निर्णय

कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा विचार करु लागल्याने प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

४. प्रायोगिक गटाला दिलेल्या प्रयोग मात्रेमुळे मूली या एखादा निर्णय घेण्याची वेळ आल्यानंतर तो निर्णय घेताना समस्या नेमकी काय, भोवतालची परिस्थिती, उपलब्ध असलेले पर्याय, त्याचा स्वतःवर व इतरांवर होणारा परिणाम यांच्या विचार करु लागल्याने त्यांच्या स्वतः संबंधीचे निर्णय स्वतः घेण्याची प्रवृत्ती वाढल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटाच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याने आढळून आले.

5. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली यावरुन असे स्पष्ट होते, की आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या निर्णयक्षमता या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

४. संशोधिकेने प्रथम स्वत्वाची जाणीव, परिणामकारक सुसंवाद, निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित पूर्वोत्तर चाचणी प्रायोगिक व नियंत्रित दोन्ही गटांना दिल्यानंतर समस्या निराकरण या कौशल्यावर आधारित पूर्वचाचणी प्रायोगिक व नियंत्रित दोन्ही गटांना दिली त्यानंतर समस्या निराकरण या कौशल्यावर आधारित उपक्रमांची मात्रा फक्त प्रायोगिक गटाला दिली . नियंत्रित गटाला या उपक्रमांच्या मात्रांचा अभाव होता. त्यानंतर दोन्ही गटांना समस्या निराकरण जीवन कौशल्यावर आधारित उत्तर चाचणी दिली. त्यातील प्रायोगिक गटाने समस्या निराकरण या जीवन कौशल्यावर आधारित असणा-या प्राविण्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित केलेल्या गुणांची तुलना खालीलप्रमाणे दिली आहे.

**परिकल्पना -$H_{10}$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्या करणे.

**शून्य परिकल्पना -**

समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ४ मध्ये प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.३१**

**प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या स्वत्वाची जाणीव विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३०.८९ | ३.४६ | २८ | ४.८१ | २.०५ | २.७७ | २७ | ** |
| उत्तर चाचणी | ३५.७८ | ४.१२ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३०.८९ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३५.७८ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ४.८९ एवढा आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान हे जास्त आहे.

२) प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.४६ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ४.१२ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.६५ एवढा आहे. उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलन हे पूर्व चाचणी गुणांक प्रमाण विचलनापेक्षा जास्त आहे. यावरुन पूर्व चाचणीत हा गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ४.८१ हे त्यापेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.८१ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.
२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या स्वातीची गोष्ट या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुलींची स्वतःच्या समस्या विशद करुन सांगण्याची

मानसिक तयारी झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविलेल्या प्रयोगामुळे प्रायोगिक गटातील मुलींमध्ये समस्या सोडविण्यास स्वतःहून पुढाकार घेण्याची वृत्तीची वाढ झाली व त्या वृत्तीचा विकास ही झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली स्वतःचे प्रश्न स्वतः सोडविण्यासाठी प्रयत्न करु लागल्या, आवश्यक तेथे विचार विनिमय करु लागल्या, एकमेकांशी संवाद साधू लागल्या, त्यामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

**परिकल्पना -$H_{11}$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा परिणामांचा अभ्यास.

**शून्य परिकल्पना -**

समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ४ मध्ये नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.३२**

| नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३०.८२ | ३.५२ | २८ | ०.२१ | २.०५ | २.७७ | २७ | n.c |
| उत्तर चाचणी | ३१.०३ | ३.८१ | | | | | | |

वरील कोष्टकात नियंत्रित गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) नियंत्रित गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३०.८२ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.०३ एवढे आहे.नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ०.२१ एवढा आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान किंचित जास्त आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) नियंत्रित गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.५२ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.८१ एवढे आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.२८ एवढा आहे. पूर्व चाचणीत नियंत्रित गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ०.२९ आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ०.२८ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नसल्याने वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या समस्या निराकरण विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**परिकल्पना - $H_{12}$ चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ४ मध्ये प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५.३३**

**प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींनी समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्य उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| प्रायोगिक गट | ३५.७८ | ४.१२ | ५६ | ५.४१ | २.०१ | २.६८ | ५४ | ** |
| नियंत्रित गट | ३०.०३ | ३.८१ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक व नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३५.७८ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३०.०३ आहे. यावरुन असे दिसते की, प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान हे नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणी मध्यमानापेक्षा खूपच जास्त आहे. दोन्ही गटातील मध्यमानातील फरक ५.७५ एवढा आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ४.१२ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ३.८१ एवढे आहे. प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलनातील फरक ०.०९ एवढा आहे. नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन प्रायोगिक गटाच्या प्रमाण विचलनापेक्षा कमी आहे. यावरुन असे समजते की नियंत्रित गट प्रायोगिक गटाच्या तुलनेत एकजिनसी आहे.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा (df) - ५४ आहे. ५४ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.६८ आहे. प्राप्त टी मूल्य ५.४१ आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ५.४१ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या स्वातीची गोष्ट या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुलींची स्वतःच्या समस्या विशद करुन सांगण्याची मानसिक तयारी झाल्याने त्यांच्या संपादनात नियत्रित गटापेक्षा लक्षणीय वाढ झाली.

३) प्रायोगिक गटावर राबविलेल्या प्रयोगामुळे प्रायोगिक गटातील मुलींमध्ये समस्या सोडविण्यास स्वतःहून पुढाकार घेण्याची वृत्तीची वाढ झाली व विकास ही झाल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायेगिक गटातील मुली स्वतःच्या प्रश्न वा समस्या मांडण्याचा प्रयत्न करु लागल्या, आवश्यक तेथे विचारविनिमय करु लागल्या, एकमेकांशी संवाद साधू लागल्या, त्यामुळे त्यांच्या संपादनात नियंत्रित गटाच्या तुलनेने लक्षणीय वाढ झाल्याचे आढळले.

5. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली, म्हणून की आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या समस्या निराकरण या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**परिकल्पना - $H_{13}$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

सर्जनशील विचार विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ५ मध्ये प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५. ३४**

**प्रायोगिक गटातील विदयार्थिनींच्या सर्जनशील विचार विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना.**

| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थी संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३१.४२ | ३.८४ | २८ | ४.३६ | २.०५ | २.७७ | २७ | ** |
| उत्तर चाचणी | ३६.३२ | ४.५१ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) प्रायोगिक गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.४२ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३६.३२ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ४.८९ एवढा आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान हे जास्त आहे. परंतू हा फरक सार्थक आहे, किंवा नाही, हे पाहणे आवश्यक आहे.

२) प्रायोगिक गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.८४ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ४.५१ एवढे आहे. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.६७ एवढा आहे. उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलन हे पूर्व चाचणी गुणांक प्रमाण विचलनापेक्षा जास्त आहे. यावरुन पूर्व चाचणीत हा गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ४.३६ हे त्यापेक्षा अधिक आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.३६ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून वरील शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलता विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली मूळ विचार समजून घेणे, नवनवीन विचारांचा मागोवा घेणे,या कृती करु लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादना वाढ झाली, म्हणून ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

३) प्रायोगिक गटातील मुलींना सतत नवीन कल्पना करायला प्रोत्साहन मिळाल्याने त्या मनाने मोकळ्या व आनंदी राहू लागल्याने प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्व चाचणीपेक्षा लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे म्हणता येईल.

४) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली वर्तमान समस्येबाबत अधिक उपयुक्त संकल्पनांचा अवलंब करु लागल्यने,मुक्त अनुभवास सामोरे जावू लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनापेक्षा पूर्व चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

**परिकल्पना - $H_{14}$ चे परीक्षण**

**उद्दिष्टे - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -**

सर्जनशील विचार विषयक जीवन कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ५ मध्ये नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५. ३५**

| नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या सर्जनशील विचार विषयक जीवन कौशल्य संपादन पूर्व-चाचणी व उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| पूर्व चाचणी | ३१.१४ | ३.६८ | २८ | ०.३९ | २.०५ | २.७७ | २७ | n.c |
| उत्तर चाचणी | ३१.५३ | ३.७८० | | | | | | |

वरील कोष्टकात नियंत्रित गटाचे पूर्व चाचणी व उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

१) नियंत्रित गटाचे पूर्वचाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.१४ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे मध्यमान ३१.५३ एवढे आहे.नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील मध्यमानातील फरक ०.३९३ एवढा आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी गुणांक मध्यमानापेक्षा उत्तर चाचणी गुणांक मध्यमान किंचित जास्त आहे.

२) नियंत्रित गटाचे पूर्व चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.६८ एवढे आहे व उत्तर चाचणीतील गुणांकाचे प्रमाण विचलन ३.७८ एवढे आहे. नियंत्रित गटाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणी गुणांकातील प्रमाण विचलनातील फरक ०.०९ एवढा आहे. पूर्व चाचणीत नियंत्रित गट उत्तर चाचणीपेक्षा जास्त एकजिनसी जाणवतो.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा - २७ आहे. २७ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.७७ आहे. प्राप्त टी मूल्य ०.३९ आहे.

**निष्कर्ष -** १) प्राप्त टी मूल्य ०.०९ आहे. प्राप्त टी मूल्य ०.३९ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नसल्याने वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या सर्जनशीलता विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**परिकल्पना - $H_{15}$ चे परीक्षण**

**उद्दिष्ट - प्रस्तुत संशोधनातील मुख्य उद्दिष्ट हे खालीलप्रमाणे दिले आहे.**

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.

**शून्य परिकल्पना -** सर्जनशील विचार जीवन विषयक कौशल्यावर आधारित चाचणी क्र. ५ मध्ये प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींच्या उत्तर चाचणीतील संपादणूकीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**कोष्टक क्र. ५. ३६**

| प्रायोगिक व नियंत्रित गटातील विदयार्थिनींनी सर्जनशील विचार विषयक जीवन कौशल्य उत्तर चाचणीमध्ये संपादित गुणांची तुलना. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परीक्षण | मध्यमान M | प्रमाण विचलन SD | गटातील विद्यार्थि संख्या N | प्राप्त टी. मूल्य | नमुना टी.मूल्य | | स्वाधीनता मात्रा df | शेरा |
| | | | | | ०.०५ | ०.०१ | | |
| प्रायोगिक गट | ३६.३२ | ४.५१ | ५६ | ४.३० | २.०१ | २.६८ | ५४ | ** |
| नियंत्रित गट | ३१.५३ | ३.७८ | | | | | | |

वरील कोष्टकात प्रायोगिक व नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्राप्तांकावरुन काढलेले मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य दिले आहे.

**निरीक्षण -**

**१)** प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३६.३२ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी मध्यमान ३१.५३ आहे. यावरुन असे दिसते की, प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी मध्यमान हे नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणी मध्यमानापेक्षा खूपच जास्त आहे. दोन्ही गटातील मध्यमानातील फरक ४.७८ एवढा आहे. परंतू हा फरक सार्थक आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

२) प्रायोगिक गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ४.५१ असून नियंत्रित गटाचे उत्तर चाचणी प्रमाण विचलन ३.७८ एवढे आहे. प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी गुणांक प्रमाण विचलनातील फरक ०.७३ एवढा आहे. नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन प्रायोगिक गटाच्या प्रमाण विचलनापेक्षा कमी आहे. यावरुन असे समजते की नियंत्रित गट प्रायोगिक गटाच्या तुलनेत एकजिनसी आहे.

३) या ठिकाणी स्वाधीनता मात्रा (df) - ५४ आहे. ५४ या स्वाधीनता मात्रेसाठी ०.०१ या सार्थकता स्तरावर नमुना टी-मूल्य २.६८ आहे. प्राप्त टी मूल्य ४.३० आहे.

**निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.३० हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक आहे असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली मूळ विचार समजून घेणे, नवनवीन विचारांचा मागोवा घेणे,या कृती करु लागल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटापेक्षा अधिक वाढ झाली म्हणून ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

३) प्रायोगिक गटातील मुलींना सतत नवीन कल्पना करायला प्रोत्साहन मिळाल्याने त्या मनाने मोकळ्या व आनंदी राहू लागल्याने प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात नियंत्रित गटापेक्षा लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे म्हणता येईल असे आढळले.

४) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली वर्तमान समस्येबाबत अधिक उपयुक्त संकल्पनांचा अवलंब करु लागल्यने,मुक्त अनुभवास सामोरे जावू लागल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

5. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली म्हणून आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या सर्जनशीलता जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**कोष्टक क्रं. ५.३७**

## ५. ५ टेबलवरुन काढलेले सकंलित प्राप्त मूल्य

| अ.क्र. | जीवन कौशल्य | गटाचे नाव | चाचणी | प्राप्त t मूल्य | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | स्वत्वाची जाणीव कौशल्य | प्रायोगिक गट | पूर्व व उत्तर चाचणी | ४.५६ | ** |
| २) | स्वत्वाची जाणीव कौशल्य | नियंत्रित गट | पूर्व व उत्तर चाचणी | ०.५८ | n.c |
| ३) | स्वत्वाची जाणीव कौशल्य | प्रायोगिक व नियंत्रित गट | उत्तर व उत्तर चाचणी | ४.५६ | ** |
| ४) | परिणामकारक सुसंवाद कौशल्य | प्रायोगिक गट | पूर्व व उत्तर चाचणी | ४.५७ | ** |
| ५) | परिणामकारक सुसंवाद कौशल्य | नियंत्रित गट | पूर्व व उत्तर चाचणी | ०.४७१ | n.c |
| ६) | परिणामकारक सुसंवाद कौशल्य | प्रायोगिक व नियंत्रित गट | उत्तर व उत्तर चाचणी | ४.४७ | ** |
| ७) | निर्णय क्षमता कौशल्य | प्रायोगिक गट | पूर्व व उत्तर चाचणी | ४.२९ | ** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८) | निर्णय क्षमता कौशल्य | नियंत्रित गट | पूर्व व उत्तर चाचणी | ०.१७ | n.c |
| ९) | निर्णय क्षमता कौशल्य | प्रायोगिक व नियंत्रित गट | उत्तर व उत्तर चाचणी | ४.२९ | ** |
| १०) | समस्या निराकरण कौशल्य | प्रायोगिक गट | पूर्व व उत्तर चाचणी | ४.८१ | ** |
| ११) | समस्या निराकरण कौशल्य | नियंत्रित गट | पूर्व व उत्तर चाचणी | ०.२१ | n.c |
| १२) | समस्या निराकरण कौशल्य | प्रायोगिक गट व नियंत्रित गट | उत्तर व उत्तर चाचणी | ५.४१ | ** |
| १३) | सृजनशीलता कौशल्य | प्रायोगिक गट | पूर्व व उत्तर चाचणी | ४.३६ | ** |
| १४) | सृजनशीलता कौशल्य | नियंत्रित गट | उत्तर चाचणी | ०.३९ | n.c |
| १५) | सृजनशीलता कौशल्य | प्रायोगिक व नियंत्रित गट | उत्तर व उत्तर चाचणी | ४.३० | □□ |